# *** प्रकरण २ रे ***

## संबंधित संशोधनाचे समालोचन आणि विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांच्या समस्या :-

भाग १ [अ] संबंधित संशोधनाचे समालोचन

भाग २ [आ] विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांच्या समस्या.-

[क] विनाअनुदान बी.एड्. महाविद्यालये - एक समस्या

[ख] विनाअनुदानित बी.एड्. महाविद्यालयातील समस्यांचे वर्गीकरण

[ग] विनाअनुदानित बी.एड्. महाविद्यालयांच्या शैक्षणिक समस्या

[घ] विनाअनुदानित बी.एड्. महाविद्यालयांच्या भौतिक समस्या

## प्रकरण २ रे

## संबंधित संशोधनाचे समालोचन आणि विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांच्या समस्या

### २. [अ] संबंधित संशोधनाचे समालोचन :-

"शिक्षणशास्त्र" या शाखेमधून विविध विषयावर संशोधने आज पर्यन्त झालेली आहेत. ही संशोधने बहुतांशी वेगवेगळ्या विषयांचे अध्यापन, नैदानिक कसोट्या, अध्ययन-अध्यापन सुधारण्यासाठी उपाययोजना, अपंग व मतिमंद मुलांच्या समस्या, त्यांचे शिक्षण व त्यावरील उपाय, मराठी अभाषिक विद्यार्थ्यांचे शिक्षण व शिक्षण घेत असताना त्यांना येणा-या समस्या व उपाय या व अशा विविध विषयांमध्ये झालेले आहे. परंतु गेल्या ४ - ५ वर्षांमध्ये नव्यानेच सुरु झालेली विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालये आणि या महाविद्यालयातील शैक्षणिक समस्या [स्थिती] याविषयी फारसे संशोधन झालेले नाही. परंतु मर्यादित स्वरुपात व "पेपर लिखाण" कांही संबंधित तज्ञ प्राध्यापकांकडून झालेले आहे. हे लेख व या लेखांचे वाचन संबंधित प्राध्यापकांनी सोलापूर येथे झालेल्या आखिल महाराष्ट्र शिक्षक संघटनेच्या १७व्या अधिवेशनामध्ये केले.

या लघुलेखांचे समालोचन प्रस्तुत संशोधनाच्या संदर्भात खालीलप्रमाणे केलेले आहे -

१] डॉ.अहिरे बी.जी. [१९९२]
कस्तुरबाई शिक्षण महाविद्यालय, सोलापूर - ६. यांनी "शासनाचे धोरण - विनाअनुदान प्रशिक्षण महाविद्यालयांच्या समस्या" या विषयावर चिकित्सक अभ्यास केलेला आहे व त्यावर लेख लिहिलेला आहे. प्रस्तुत पेपरच्या लिखाणासाठी त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या बदलत्या शैक्षणिक धोरणांचा विनाअनुदानित शिक्षण महाविद्यालयांवर कसा विपरित परिणाम झालेला आहे याचा चिकित्सक अभ्यास केलेला आहे.

विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील सद्यःस्थितीचा अभ्यास हेच या लघुसंशोधनाचे उद्दिष्ट आहे. या संशोधनातून त्यांना विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या पुढील शैक्षणिक समस्या दिसून आल्या. त्यांचे निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत -

१. प्राचार्य :-

अनुभवी प्राचार्य मिळविणे ही महाविद्यालयातील सर्वात मोठी समस्या आहे. कारण अनुदान व सेवावृत्तीचे इतर कोणतेही फायदे नसल्या मुळे अनुभव व ६० वर्षांच्या आतील कोणतीही व्यक्ती या महाविद्यालयांमध्ये प्राचार्य होण्यास उत्सुक नसतात. त्यामुळे सेवानिवृत्ती झालेल्या प्राध्यापक व प्राचार्यांमधून कांही लोकांची या महाविद्यालयांमध्ये प्राचार्य म्हणून निवड केली जाते.

२. प्राध्यापक वर्ग :-

या महाविद्यालयांची सतत चालण्याची अशाश्वती व त्यामुळे सेवाशाश्वतीची अनिश्चितता, सेवाशर्तीचे न मिळणारे इतर फायदे यामुळे अनुभवी पात्रताधारक व्यक्ति प्राध्यापक होण्यास तयार नाहीत. त्याचप्रमाणे जुन्या नियमानुसार बी.एड्. महाविद्यालयात ज्यांनी २५-३० वर्षे सेवा केली आहे व सेवानिवृत्तीनंतर या महाविद्यालयांमध्ये नोकरी लागलेल्या अनेक प्राध्यापकांना विद्यापीठ पात्रताधारक नाहीत म्हणून त्यांना मान्यता देत नाही व त्यामुळे चांगला दर्जेदार प्राध्यापक वर्ग या महाविद्यालयांना मिळत नाही.

३. इतर सुविधा :-

यामध्ये इमारत, मार्गदर्शन खोल्या, विज्ञान व मानसशास्त्रीय प्रयोगशाळा, ग्रंथालय व त्यातील अपुरे संदर्भ पुस्तके व ग्रंथ, कांही ठिकाणी प्रात्यक्षिक पाठांसाठी लागणाऱ्या शाळांची संख्याही कमी आहे.

प्रा.श्री.अहिरे यांनी या निष्कर्षासमवेत कांही उपाययोजना व शिफारसी सुचविलेल्या आहेत त्या खालीलप्रमाणे –

१. शासनाने सुरू केलेल्या या विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील अनेक समस्या सोडविण्यासाठी प्रशिक्षण महाविद्यालयातील अनुभवी व तज्ञ प्राध्यापक, प्राचार्य व शिक्षणतज्ञ यांची समिती नेमून या महाविद्यालयांची पाहाणी करणे आवश्यक आहे. सुरू केलेल्या महाविद्यालयात नियमानुसार पात्रताधारक प्राध्यापक, प्राचार्य व इतर शैक्षणिक सुविधा प्रात्यक्षिक पाठ घेण्यासाठी पुरेशा प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळा त्या परिसरात आहेत कां ? याची पाहाणी करावी व ज्या महाविद्यालयांनी या अटी पूर्ण केल्या आहेत ती चालू ठेवावीत व ज्यांनी या अटी पूर्ण केल्या नाहीत ती बंद करावीत.

२. ज्या महाविद्यालयांनी नियमानुसार वरील विद्यापीठाच्या सर्व अटी पूर्ण केल्या आहेत अशा महाविद्यालयांना शासनाचे जे अनुदान धोरण आहे त्यानुसार अनुदान प्राप्त करण्यात यावे.

३. या महाविद्यालयामधील अनुभवी व पात्रताधारक सर्व सेवकांना पेन्शन, प्रॉव्हिडंट फंड व इतर सेवाशर्तीचे फायदे मिळण्याची व्यवस्था करावी तरच या महाविद्यालयांचे स्थान व गुणवत्ता यांच्यात सुधारणा होऊन माध्यमिक शिक्षणाच्या गुणवत्तेवरही चांगला परिणाम होईल, म्हणून महाराष्ट्र शासनाने प्रशिक्षण महाविद्यालयांच्या बाबतीत योग्य असे धोरण निश्चित करणे आवश्यक व गरजेचे आहे.

२] प्राचार्य चंद्रकांत मोरे

[शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी]

प्राध्यापक श्री.चंद्रकांत मोरे यांनी विना अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचा चिकित्सक अभ्यास केलेला आहे. त्यांनी त्यांच्या दृष्टीक्षेपांत आलेल्या या महाविद्यालयांच्या समस्या आपल्या " विना अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालये, काही समस्या आणि उपाय "[2]

या चिकित्सक लेखामधून आपणापुढे ठेवलेल्या आहेत.

त्यांनी आपल्या लेखामधून विना अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांच्या ज्या समस्या व त्यावरील उपाय मांडलेले आहेत ते पुढील प्रमाणे आहेत -

समस्या :

१. मान्यता :- विद्यापीठाची नियमानुसार परवानगी न घेता शासकीय परवानगी घेऊन काही महाविद्यालये सुरू झाली आहेत. विद्यापीठाच्या अटी ही महाविद्यालये पूर्ण करीत नाहीत. विद्यापीठाने मान्यता काढल्यावरही राजकीय पुढा-यांच्या वरदहस्तामुळे अशी महाविद्यालये चालू असलेली दिसतात.

२. प्रवेश पध्दती :- शिवाजी विद्यापीठात विना अनुदान शिक्षणशास्त्र महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची पध्दती विचित्र आहे. फॉर्म प्रवेश अर्ज विक्रीचे अधिकार सदर महाविद्यालयांना आहेत. काही महाविद्यालये विद्यार्थ्यांशी आधी देणगीबाबत चर्चा करून मगच फॉर्म देतात. त्यामुळे ३५ % पासून ४५ % पर्यंत गुणव-ता असणा-या व्यक्तींना देखील पैशयाच्या जोरावर प्रवेश मिळतो. विद्यार्थी प्रवेशाचा केवळ देखावा केला जातो. विद्यार्थी प्रवेशात गुणव-ता निकष न राहता पैसा [देणगी] हाच त्याचा दर्जा ठरतो. त्यामुळे महाविद्यालयांचा शैक्षणिक दर्जा घसरतो.

३. भौतिक सुविधा :- शासकीय मान्यता मिळताच कोणत्याही भौतिक सुविधाची फिकीर न करता गोडाऊन सारख्या जागेत महाविद्यालये उघडण्यात येतात किंवा पूर्वीच्या शाळा, महाविद्यालयांमध्ये भरविण्यात येतात. इतर शैक्षणिक सुविधा मानसशास्त्र प्रयोगशाळा, ग्रंथालय नाममात्र असतात. अशा ठिकाणी सदर वर्षी नेमलेल्या कमिशनने त्याच्या पूर्ततेकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते.

४. प्राचार्य :-

खूपच थोडया महाविद्यालयामध्ये मान्यताप्राप्त प्राचार्य आहेत. प्राचार्य संस्थाचालकांच्या हातातील "बाहुली" म्हणून काम करतात.

५. प्राध्यापक :-

विद्यापीठाच्या एम.ए., एम.एड्. व एम.एस्सी., एम.एड्. या अटीमुळे प्राध्यापक मिळणे अवघड पडते. निवड समितीस निवड करण्याची फारशी गरज पडत नाही. काही वेळा संस्थेतील इतर शैक्षणिक शाखांमधून शिक्षकांना मान्यता नसतानाही नाममात्र मानधनावर नेमून गरज पूर्ण केली जाते. इतरांना गरजेनुसार कमी अधिक पगार दिला जातो. त्यामुळे चांगला प्राध्यापकवर्ग मिळत नाही.

६. कार्यालयीन कर्मचारी :-

शासकीय नियमानुसार नेमले जात नाहीत. कर्मचारी वर्गात नातेवाईक जवळचे लांबचेच जास्त असतात. त्यामुळे त्यांच्याकडून दैनंदिन कामकाज सुरळीतपणे पार पाडणे जिकरीचे जाते.

७. कामकाज :-

ही महाविद्यालये उशिरा सुरु होतात त्यामुळे व्यवस्थितपणे अभ्यासक्रम पूर्ण केला जात नाही. तास व प्रात्यक्षिक काम नीटपणे घेतली जात नाहीत. पर्यायाने विद्यार्थ्यांचे नुकसान होते.

८. वित्त व्यवस्था :-

संलग्नीकरणाची फी विद्यापीठाने तुफान वाढविलेली आहे. वित्तव्यवस्थेबाबत संस्था चालकांना अवास्तव स्वातंत्र्य प्राप्त झाले आहे. स्टाफला कमी पगारात राबविले जाते. विद्यापीठ नियंत्रणाचा नुसता कागदी धाक दाखविला जातो. यात प्रत्यक्ष कृतीचा अभाव दिसतो.

९. अंतरक्रीया :-

विना अनुदान शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचा विद्यापीठांशी असणारा संबंध फारसा चांगला नाही.

प्राचार्य आणि संस्था यातही फारसा सुसंवाद आढळून येत नाही. प्राचार्य हताशपणे संस्था सांगेल त्या पध्दतीने वागताना दिसतात.

कॉन्ट्रक्ट पध्दतीने प्राध्यापकांना नेमल्यामुळे आणि त्यातही नातेवाईक असल्याने प्राचार्य आणि प्राध्यापक यांच्यात फारसा जवळचा संबंध नसतो.

विद्यार्थी या महाविद्यालयात पैशाच्या जोरावर आलेला असतो. तो कोणास जुमानत नाही. अशा वातावरणात विद्यार्थी आणि स्टाफ यांच्यातील अंतरक्रिया या फारशा चांगल्या नसतात.

वरील समस्या या लघुलेखांमध्ये प्राचार्य मोरे यांनी मांडलेल्या आहेत. त्याचप्रमाणे त्यांनी काही उपायही या समस्यांसाठी सुचविलेले आहेत. हे उपाय खालील प्रमाणे आहेत.

उपाय :-

१. विद्यापीठाने महाविद्यालयाच्या निर्मितीसाठी घातलेल्या अटीबाबत तडजोड करता कामा नये. शासकीय तसेच राजकीय पुढा-यांच्या दबावाला बळी पडू नये. आपले स्वातंत्र्य अबाधित राखावे.

२. विद्यार्थ्यांना विना अनुदानित महाविद्यालयात प्रवेश देण्यासाठी "केंद्रित पध्दत" विद्यापीठ स्तरावर राबवावी.

३. प्रवेशातील "संस्था कोटा", "प्राचार्य कोटा" काढून टाकावा. पूर्णतहा गुणवत्तेनुसार प्रवेश द्यावा. हवेतर गुणवत्ता निश्चित करण्याचे नियम बदलावेत. बी.एड्. अभ्यासक्रमात प्रवेश घेण्यासाठी पदवीला ५० % गुणांची अट करावी.

४. विना अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयात सर्वप्रकारच्या भौतिक

सुविधा असल्याशिवाय विद्यापीठाने सदर महाविद्यालयांना मान्यता देऊ नये.

५. प्राचार्य व प्राध्यापक पदासाठी "सेवानिवृ-त" व्यक्तींचा विचार करू नये. ज्यांना नोक-या नाहीत अशा शैक्षणिक अर्हता धारकांना संधी द्यावी.

६. सदर महाविद्यालयामध्ये बौध्दिक व प्रात्यक्षिक कामे वर्षभर चालेल यासाठी काही उपाययोजना आखाव्यात. जर या महाविद्यालयाच्या प्रवेशाचे काम एप्रिल महिन्यात संपले तर हे शक्य होईल.

७. देणगी प्रकरण मिटविण्यासाठी बी.एड्. अभ्यासक्रमाची फी ८००० रू. करावी व त्या रकमेच्या विनियोगासाठी काटेकोर नियम विद्यापीठाने करावेत व त्याप्रमाणे अंमल बजावणी करावी.

८. संस्था चालक, प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी यांच्यात दबावाचे वातावरण न राहता स्नेहाचे व परस्पराप्रती विश्वासाचे नाते असावे.

९. प्राचार्य व प्राध्यापक संघटनांनी विना अनुदानित शिक्षणशास्त्र महा- विद्यालयातील भ्रष्टाचार निपटून काढण्यासाठी कठोर पावले उचलावीत.

१०. बी.एड्. प्रशिक्षित शिक्षकांची येत्या १० वर्षातील गरज लक्षात घेऊन बी.एड्. महाविद्यालयाची संख्या राज्यस्तरावर ठरवावी. त्यानुसार महाविद्यालये ठेवून इतर महाविद्यालये त्वरीत बंद करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

३] प्रा.अरविंद टेके

[सोशल बी.एड्. कॉलेज,सोलापूर]

यांनी "विना अनुदान बी.एड्. महाविद्यालयांच्या समस्या"[3] या विषयावर चिकित्सक अभ्यास करून सदर निबंध [लेख] हा सादर केलेला आहे.

हा लेख लिहीण्यासाठी त्यांनी विना अनुदानित बी.एड्. महाविद्यालयांतील काही प्राध्यापकांशी चर्चा केलेली आहे. त्याचप्रमाणे प्रश्नावली देखील भरून घेतलेल्या आहेत, व त्याचा अभ्यास करून संबंधित लेख लिहीलेला आहे. विना अनुदानित बी.एड्. महाविद्यालयांच्या समस्या त्यांच्याशी संबंधीत घटकांच्या संदर्भात त्यांनी मांडलेल्या आहेत. त्या पुढील प्रमाणे -

१. शासन :-

शासन एकुण उत्पन्नाच्या ३ % खर्च शिक्षणक्षेत्रावर केला जातो. या ३ % पैकी ९० % रक्कम ही पगारावर खर्च होते; त्यामुळे शैक्षणिक विकासाकरिता शासनास पाहिजे इतका खर्च करता येत नाही. त्यामुळेच विना अनुदान तत्वावरील शैक्षणिक संस्थाना शासन परवानगी देत राहते. देशातील ६५ % जनता आजही निरक्षर आहे.

२. विद्यापीठ :-

राजकिय वजनाचा वापर करून अधिकाधिक संस्थेने विना अनुदान तत्वावरील बी.एड्. कॉलेजेस सुरू केलेली आहेत. शासनाने नव्याने मंजुरी दिलेल्या महाविद्यालयामुळे विद्यापीठ कार्यावर ताण निर्माण होत असून त्या सर्व कॉलेजेसवर नियंत्रण ठेवणे अवघड बनत आहे. राजकीय हस्तक्षेपामुळे लोकप्रतिनिधींच्या विना अनुदान प्राप्त बी.एड्. कॉलेजेसवर कारवाई करावयाची झाल्यास विद्यापीठावर बंधने पडतात.

३. संस्थाचालक :-

विना अनुदानित बी.एड्. कॉलेजचे एकूण कामकाज हे अनुदानित कॉलेजप्रमाणेच सामान्यत: असले पाहिजे. विद्यापीठाच्या नियमानुसार सुविधा असल्या पाहिजेत,परंतु त्यासाठी पैसा कोठून उपलब्ध करावयाचा ? हा संस्थाचालकांचा प्रश्न आहे. मिळणा-या फी मधून यासर्व बाबींची पूर्तता होऊ शकत नाही.

४. प्राचार्य :-

प्राध्यापकाच्या शैक्षणिक अर्हतेसंबंधी असणा-या नियमानुसार पात्र प्राध्यापक सहजासहजी मिळत नसल्याने महाविद्यालयीन कामकाज कसे चालवावयाचे असा प्रश्न आहे. विद्यापीठ नियमानुसार सुविधांची संस्थाचालक पूर्तता करीत नाहीत. आहे तेवढयाच भागवा अशी संस्था-चालकांची प्रवृ-ती असल्याने उपलब्ध संविधांवरच काम भागवणे प्राचार्यांना क्रमप्राप्त ठरते. ग्रंथालयामध्ये पुस्तकांच्या अनुपलब्धतेमुळे महत्त्वपूर्ण पुस्तके व त्यातील ज्ञानांपासून प्राध्यापकांना वंचित रहावे लागते, त्याचा परिणाम त्यांच्या अध्यापनावर होतो.

महाविद्यालयीन प्राध्यापकाला सेवामान्यता दिल्यानंतर विद्यार्थ्यांना बी.एड्.कॉलेजमध्ये प्रवेश मिळतो. यामध्ये बराच कालापव्यय होतो आणि उर्वरीत अपु-या वेळात सर्व कार्य पूर्ण करुन घेणे हे अवघड होते.

बहुचर्चित डोनेशनमुळे प्राचार्य अडचणीत येतात. संस्थेचे ते सेवकच असल्याने संस्थाचालकांना कांही सांगू शकत नाहीत,त्यामुळे पालक व संस्था यातील कोणाचे ऐकावयाचे असा प्रश्न पडतो.

५. प्राध्यापक :-

विद्यापीठाच्या शैक्षणिक अर्हतेमुळे सहजासहजी बी.एड्. महाविद्यालयात नोकरी मिळत नाही. मिळाल्यास यु.जी.सी.ची

"नेट" परीक्षा उत्तीर्ण होण्याची अट असल्याने भवितव्याच्या दृष्टीने समस्यांत भर पडते. अगोदरच विनाअनुदानित महाविद्यालयाचे भवितव्य नोकरीचे स्थैर्य, भविष्य निर्वाह निधी याबाबतच्या समस्याने [चिंता] ग्रस्त असतो.

महाविद्यालयीन सेवेत नव्यानेच प्रारंभ केल्याने आणि नवीन अभ्यासक्रमामुळे अध्यापनामध्ये समस्या निर्माण होतात. पुस्तके व संदर्भ ग्रंथाच्या अभावामुळे अध्यापनाच्या पूर्ववत तयारीत अडसर निर्माण होतात. विद्यार्थ्यांचा बौध्दिक दर्जा लक्षात घेता अनुदानित बी.एड्. कॉलिजपेक्षा विनाअनुदानित कॉलिजमध्ये कामाचा अधिक ताण पडतो. इथे प्रवेश घेणारे विद्यार्थी कमी गुणवत्तेचे असतात.

६. विद्यार्थी :-

विद्यापीठीय नियमांची पूर्तता करण्याच्या संस्थेच्या असमर्थतेमुळे महाविद्यालये उशीरा सुरु होतात, त्यामुळे काळ, काम, वेग यांचा मेळ साधत कार्यभाग संपविणे क्रमप्राप्त ठरते. त्यामुळे प्रात्यक्षिक कार्य गडबडीत व कसेबसे उरकावे लागते. त्यामुळे प्रात्यक्षिक कार्यामागील मूळ उद्दिष्टांनाच धक्का पोहोचतो, पर्यायाने विद्यार्थ्यांचे नुकसान होते. वसतिगृहे नसतात.

सरावपाठ व बी.एड् चा अभ्यासक्रम यांच्याशी संबंधित पुस्तके ग्रंथालयात उपलब्ध होत नसल्याने मार्गदर्शन घेताना आणि पाठाची पूर्वतयारी करताना अडचणी निर्माण होतात. अभ्यासातही अडथळे निर्माण होतात.

विद्यार्थ्यांचा बौध्दिक दर्जा सुमार असलातरी महाविद्यालयातील प्राध्यापक वर्गच नवीन असल्याने त्यांच्या अनुभवाअभावी सुस्पष्ट ज्ञान व मार्गदर्शन त्यांना प्राप्त होत नाही.

प्रस्तुत लेखनामध्ये या समस्येच्या निराकरणासाठी लेखकास

समस्यांशी संबंधित सा-यांनीच आत्मनिरीक्षण व चिंतन करण्याची गरज आहे व त्यानुसार प्रभावी व परिणामकारक पावले संबंधित घटकांनी उचलणे गरजेचे आहे असे वाटते.

४] प्रा.सौ.आर्या भिडे :-
गुरुकृपा कॉलेज ऑफ एज्युकेशन अ‍ॅण्ड रिसर्च, कल्याण [प.], जिल्हा - ठाणे

यांनी "विनाअनुदान तत्वावरील शिक्षण महाविद्यालयाच्या समस्या"[४] या विषयावर चिकित्सक अभ्यास करुन वरील लेख लिहिलेला आहे.

त्यांच्यामते विनाअनुदानित महाविद्यालयांच्या समस्या संस्थाचालकांच्या, व्यवस्थापकीय, विद्यार्थ्यांच्या, प्राचार्यांच्या, प्राध्यापकांच्या अशा अनेक पातळीवर आहेत. त्यातील प्रत्येक पातळीचा विचार स्वतंत्रपणे करणे आवश्यक आहे.

त्यांनी आपल्या चिकित्सक अभ्यासातून पुढील शैक्षणिक समस्या निष्कर्षांच्या स्वरुपात मांडलेल्या आहेत.

* संस्थाचालकांच्या समस्या -

१] महाविद्यालयाची शासकीय परवानगी मिळाल्यानंतर विद्यापीठाची संलग्नता व परवानगी मिळविण्यासाठी कांही अटी पूर्ण कराव्या लागतात त्यासाठी सुरुवातीस भक्कम आर्थिक पाठबळ जमा करणे अवघड आहे. जागा, ग्रंथालय व इतर साहित्य, फर्निचर इ.साठी लागणारा प्राथमिक खर्च अंदाजे १८ ते २० लाख हा संस्थेलाच करावा लागतो.

२] विनाअनुदान तत्वावरील महाविद्यालयातील सेवानिवृत्तीवेतन व भविष्य निर्वाह निधीसाठी ग्राहय धरली न गेल्याने अनुभवी प्राध्यापक मिळत नाहीत. पीएच.डी. व दहा वर्षे अनुभव असलेले कार्यक्षम प्राचार्य

मिळणे ही अत्यंत अवघड गोष्ट आहे. प्राचार्यांच्या अभावी महाविद्यालयाचे तास, कामकाज भरकटण्याचीच शक्यता असते.

३] शिक्षणाचे महत्त्व पटणारे, एकदिलाने विधायक काम करणारे कार्यकर्ते व स्थानिक व्यवस्थापन समितीचे सभासद मिळविणे ही अवघड बाब आहे.

४] विस्ताराच्या योजना आखताना, अनुदानाअभावी सतत पैशाची टंचाई जाणवत रहाते व विकास कार्याला आपोआप मर्यादा पडतात.

* प्राचार्यांच्या समस्या -

१] प्राचार्य हे विद्यार्थी, संचालक, शिक्षकवृंद यांच्यातील दुवा असतात. संस्थाचालकांना प्राचार्यांच्या विचाराचे महत्त्व कळले नाही तर त्यातून समस्या निर्माण होतात. तसेच संस्थाचालक हुकूमशाही प्रवृत्तीचे असल्यास त्यातून समस्या येतात.

२] प्रशिक्षित व गुणवत्ताप्राप्त प्राध्यापकवर्ग बहुधा मिळत नाही. त्यामुळे महाविद्यालयाचा चांगला निकाल लावणे तसेच महाविद्यालय सुरळीतपणे चालवणे अवघड बनते.

३] संस्था आवश्यक त्या सुविधा विद्यार्थी व प्राध्यापकवर्ग यांना पुरवत नाहीत. अशावेळी प्राचार्यांची स्थिती अवघड बनते.

४] विनाअनुदान तत्त्वावरील महाविद्यालयांकडे बघण्याचा समाजाचा व विद्यापीठाचा दृष्टीकोन वेगळा असतो त्यामुळे व्यवस्थित काम पूर्ण करणे अवघड बनते. कित्येक वेळा मनस्ताप होतो.

* प्राध्यापकांच्या समस्या -

१] कांही महाविद्यालयातून वेतनश्रेणीनुसार वेतन दिले जात नाही.

२] अनुदानित महाविद्यालयात प्रवेश न मिळालेले व कमी दर्जाची गुणवत्ता असणारे विद्यार्थी असतात त्यांच्याकडून विशेषत: प्रात्यक्षिक कार्य करवून घेणे अवघड होते.

३] संदर्भासाठी विपुल ग्रंथसंग्रह सर्वच महाविद्यालयात उपलब्ध होत नाही.

४] सेवासुरक्षितता नसते. तसेच सेवाशर्तींचे नियम लागू होत नाहीत, त्यामुळे अस्थिरतेची भावना मनात सतत राहाते.

५] विनाअनुदानित महाविद्यालयातील प्राध्यापकांची संघटना नसल्याने अन्याय झाल्यास एकत्रित दाद मागणे अवघड बनते.

* विद्यार्थ्यांच्या समस्या -

१] प्रवेशासाठी न परवडणारी देणगी द्यावी लागते.

२] अनुभवी व गुणवत्ताप्राप्त प्राध्यापकवर्ग उपलब्ध नसतो, त्यामुळे योग्य मार्गदर्शन मिळत नाही.

३] प्रशिक्षित लायब्ररीयन व पुस्तके उपलब्ध नसतात. यामुळे ग्रंथालयासारख्या सुविधा मिळत नाहीत.

४] शाळा उपलब्ध न झाल्याने सरावपाठाला लांबच्या शाळेत जावे लागते.

५] अभ्यासक्रमासाठी आवश्यक सुविधा प्राप्त होत नाहीत. उदा. मानसशास्त्र प्रयोग साहित्य, शालेय पाठ्यपुस्तके, शैक्षणिक साहित्य इ.

प्रस्तुत लेखामध्ये वरील समस्यांवरील उपायही प्रा. सौ. आर्या भिडे यांनी मांडलेले आहेत. त्यांनी सुचविलेले उपाय पुढील प्रमाणे आहेत.

* समस्यांवरील उपाय -

१] विद्यापीठाने महाविद्यालय सुरू झाल्यापासून पहिली ३ वर्षे पुस्तके, शैक्षणिक साहित्य व इतर सुविधा याबाबत उदार दृष्टीकोन ठेवावा.

२] एम. एड्. ला ५५ % गुण असलेले प्राध्यापक उपलब्ध न झाल्यास कमी गुणवत्तेच्या प्राध्यापकांना तात्पुरती परवानगी द्यावी.

३] विद्यापीठाने प्राध्यापक वर्गास सेवांतर्गत प्रशिक्षण द्यावे. तसेच प्राध्यापकेतर कर्मचा-यांचीही कामाची पूर्व तयारी संस्थेने करून घ्यावी.

४] प्राचार्य व प्राध्यापकांच्या संघटना असाव्यात व त्यामधून वरील समस्यांचा वेळोवेळी विचार व्हावा.

५] शासनाने / विद्यापीठाने १०० % नसले तरी कायमस्वरूपी काहीतरी अनुदान द्यावे.

६] संस्थेने बी.एड्. महाविद्यालयाकडे बघण्याचा दृष्टीकोन ज्ञानदानाचा ठेवावा. महाविद्यालयाच्या विकासासाठी आवश्यक असतील तेवढेच पैसे देणगीच्या स्वरूपात गोळा करावे. तसेच विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना जास्तीत जास्त सुविधा देण्याचा विचार करावा.

५] प्रा.वसंत सीताराम देशपांडे :-
संचालक, शिक्षण अभ्यास केंद्र, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन, पुणे.

प्रा.देशपांडे यांनी "विना अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांच्या समस्या"[५] हा निबंध सादर केलेला आहे. या अभ्यासपर निबंधामध्ये त्यांनी साकल्याने विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांच्या समस्या मांडलेल्या आहेत.

प्रस्तुत निबंधात त्यांनी मांडलेल्या समस्या या स्वत: २३ महाविद्यालयांची प्रत्यक्ष पाहणी करून तसेच सहका-यांशी चर्चा करून मांडलेल्या आहेत. त्या पुढील प्रमाणे आहेत.

१. <u>महाविद्यालयांची मान्यता :-</u>

जवळजवळ सर्वच महाविद्यालयांची मान्यता कायदा कलम ४३ [४ क[४] ] नुसार झालेली आहे. शासनाने प्रथम मान्यता दिली आणि विद्यापीठाने नंतर वास्तविक गरज, भौतिक सुविधा इ. चा नंतर विचार केला गेला नाही.

* त्यामुळे विद्यापीठाच्या स्वायत्ततेचा संकोच झाला. विद्यापीठांची

प्रतिष्ठा घसरली.

* शिक्षणेतर महत्त्व मिळाल्याने जिल्हयातील शैक्षणिक विकासाचा समतोल ढळला.

२. <u>विद्यार्थी संख्या :-</u>

विना अनुदान महाविद्यालयांना शासनाने मोठया प्रमाणात विद्यार्थी वाटप केले. त्यामुळे

* अभ्यासक्रमाचे व्यवसाय प्रशिक्षणाचे स्वरुप बदलून केवळ औपपत्तिक भागावर भर दिला गेला.

३. <u>प्राचार्य :-</u>

विना अनुदानित महाविद्यालयांतील प्राचार्य हे विद्यापीठाने निश्चित केलेल्या पात्रतेचे आढळून येत नाहीत. त्यामुळे पुढील समस्या जाणवतात -

* अपूर्ण पात्रतेच्या जाणीवेने संबंधित व्यक्तींच्या ठिकाणी आत्मविश्वासाचा अभाव आढळला.

* अनुभव, पात्रता आणि आत्मविश्वासाच्या अभावामुळे प्राध्यापक ,सेवक आणि विद्यार्थी यांना अपुरे मार्गदर्शन मिळते.

४. <u>प्राध्यापक :-</u>

काही काही बी.एड्. महाविद्यालयात प्राध्यापकांची संख्या त्यांना त्यांच्या संशोधनामध्ये विद्यार्थ्यांच्या संख्येपेक्षा कमी आढळून आली. १:१० हे प्रमाणात ती नव्हती. त्यामुळे पुढील समस्या निर्माण झाल्या. तसेच खूप थोडे पात्रताधारक होते.

* उपस्थित प्राध्यापकांच्यावर अनावश्यक कामाचा बोजा पडतो.

* प्रशिक्षण दुर्लक्षित राहते. विद्यार्थ्यांच्या ठिकाणी कौशल्य निर्मिती होऊ शकत नाही.

५. भौतिक सुविधा :-

कोणतेही प्रशिक्षण पार पाडायचे तर तज्ञ मनुष्यबळाबरोबर भौतिक सुविधांचीही आवश्यकता असते. म्हणूनच विद्यापीठाकडून काही किमान प्रमाणित मोजमापांचा आग्रह धरला जातो. ब-याच विना अनुदानित महाविद्यालयात या आवश्यक सुविधा उपलब्ध नसतात, त्यामुळे पुढील समस्या निर्माण होतात.

* विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण प्रतिकूल वातावरणात चालू रहाते.

* विद्यार्थ्यांच्या वृ-ती घडणीवर याचा अनिष्ट परिणाम होतो.

६. ग्रंथालय सुविधा :-

बी.एड्. औपपत्तिक व प्रात्यक्षित भागासाठी ग्रंथालयाचा उपयोग अपरिहार्यच आहे. परंतु बहुतांशी विना अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयात ग्रंथालयीन सुविधा उपलब्ध नसतात. त्यातून पुढील समस्या निर्माण होतात.

* प्रशिक्षण पूर्णपणे दुर्लक्षित राहते व अभ्यासक्रमाला औपपत्तिक तयारीचा अभ्यासक्रम [पाठांतराने उत्तीर्ण होण्याचा] असे स्वरूप प्राप्त होते.

७. अध्ययन अध्यापन प्रक्रिया :-

व्यवस्थित नियोजनाचा अभाव. त्यामुळे प्रात्यक्षिक कामे केवळ उरकली जाण्यावर अधिक भर आढळतो. त्यामुळे अशा कार्यवाहीतून पुढील समस्या निर्माण होतात.

१] प्रशिक्षण कार्यक्रमातही औपपत्तिक भागावरच भर असतो. अशी विद्यार्थ्यांची समजूत होते.

२] व्यावसायिक कौशल्ये व वृ-ती यांच्या घडणीला वाव न मिळाल्याने आवश्यक त्या क्षमता निर्माण होत नाहीत.

प्रस्तुत निबंधात प्रा. देशपांडे यांनी काही उपायही या संबंधित समस्यांवर सुचविलेले आहेत ते पुढील प्रमाणे आहेत.

१] विना अनुदानित महाविद्यालये सामाजिक, आर्थिक आणि राजकिय परिस्थितीची अपरिहार्य निर्मिती आहे. हे मान्य करून त्यांचा स्विकार करावा लागेल, त्यांना आपल्यात सामावून घ्यावं लागेल, समर्थ बनवावं लागेल.

२] यासाठी विचारपूर्वक ठरविलेल्या प्रमाणित सुविधा व तज्ञ मनुष्यबळ याबाबत तडजोड न स्वीकारता लवकरात लवकर अपेक्षित पूर्तता करण्यासाठी विद्यापीठाच्या विविध समित्याद्वारा सतत आग्रह धरावा लागेल.

३] प्राचार्य, प्राध्यापक व कर्मचारी यांच्या अनुभवातल्या उणीवा दूर करण्यासाठी उद्बोधनवर्ग घ्यावे लागतील.

४] काही महाविद्यालये द-तक घेऊन त्यांच्यासाठी गुणवत्तावाढीचे नियोजन व अंमलबजावणीत सहभाग दयावा लागेल.

वरील प्रमाणे नमूद केलेल्या आणि इतर अभ्यासातून असे दिसून येते की, विना अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शैक्षणिक समस्या त्याच्याशी संबंधित अशा भौतिक व जैविक अशा दोन्ही घटकांशी निगडीत आहेत. त्यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. यापूर्वी या विषयावर संशोधन विविध स्तरांवर निबंध लेखन झालेले आहे. त्यामुळे अभ्यासकाचे शिवाजी विद्यापीठ अंतर्गत विना अनुदान शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शैक्षणिक स्थितीचा अभ्यास हे एकमेव संशोधन आहे.

2. [आ] विना अनुदान शिक्षणशास्त्र महाविद्यालयांच्या समस्या :-

आपल्या देशातील शिक्षणपद्धतीमध्ये माध्यमिक शिक्षणाचे स्थान अतिशय महत्त्वाचे असे आहे. प्राथमिक व उच्चशिक्षण यांना साधणारा हा एक दुवा आहे. आजच्या झपाट्याने प्रगती करणा-या, बदलणा-या तांत्रिकयुगामध्ये काळाप्रमाणे बदलणारे शिक्षण मिळणे अतिशय गरजेचे झालेले आहे. या शिक्षणाचा पाया माध्यमिक शिक्षणाद्वारेच घातला जातो. हे माध्यमिक शिक्षण देण्यासाठी ज्या शिक्षकांची आवश्यकता आहे, तो शिक्षकवर्ग शिक्षणशास्त्र महाविद्यालयांतून तयार केला जातो. शिक्षणासंबंधीचा मूलभूत दृष्टीकोन बनविण्याचे काम प्रशिक्षण महाविद्यालयांना करावे लागते. त्यामुळे या शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचे हे स्थान शिक्षणक्षेत्रात महत्त्वाचे आहे.

महाराष्ट्र शासनाने या प्रशिक्षण महाविद्यालयांच्या बाबतीत अनेकवेळा बदलती भूमिका घेतलेली आहे. त्यामुळे या शिक्षणशास्त्र महाविद्यालयांच्या बाबतीत वेळोवेळी अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत.

महाराष्ट्र शासनाने १९८४ मध्ये महाराष्ट्रातील विद्यापीठ कायद्याच्या कलम.४३ मध्ये महत्त्वपूर्ण बदल करून महाविद्यालये सुरू करण्याचे अधिकार राज्य सरकारकडे घेतले. यामुळे नवीन शैक्षणिक धोरणामुळे महाराष्ट्रात शैक्षणिक विकासाला एकप्रकारची गति प्राप्त झाली. शिक्षणाच्या वाढत्या प्रमाणात अनुकूल संधी प्राप्त होत आहेत. त्यानुसार या शैक्षणिक वर्षात अनेक विनाअनुदान तत्वावर चालविल्या जाणा-या बी.एड्. चे प्रशिक्षण देणा-या शिक्षणशास्त्र महाविद्यालयांची स्थापना झाली. ही संख्या गेली ३ वर्षापासून भरपूर वाढलेली आहे. या महाविद्यालयांची संख्यात्मक वाढ झालेली असली तरी या शिक्षणशास्त्र महाविद्यालयांच्या समस्या देखील तितक्याच प्रमाणात वाढलेल्या आहेत.

समस्या :-

विनाअनुदानित महाविद्यालयांच्या समस्या संस्था चालकांच्या,

व्यवस्थापकीय, प्रशिक्षणार्थ्यांच्या, प्राध्यापकांच्या, प्राचार्यांच्या अशा अनेक पातळीवर व अनेक पदरी आहेत. प्रत्येक पातळीचा विचार स्वतंत्रपणे करणे आवश्यक आहे. परंतु येथे आपण केवळ शैक्षणिक स्तरावर येणा-या [ 9 ] समस्यांचाच विचार करणार आहोत.

१] विनाअनुदान बी.एड्. महाविद्यालये हीच एक मोठी समस्या :-

जेव्हा आपण शिक्षणशास्त्रीय दृष्टीकोनातून विचार करू लागतो तेव्हा हे सहज लक्षात येईल की, विनाअनुदान बी.एड्. महाविद्यालये ही संस्थेच्यादृष्टीने, समाजाच्या, राष्ट्राच्या, विद्यार्थ्यांच्या, प्राध्यापकांच्या दृष्टीने एक गंभीर समस्या बनली आहे. या महाविद्यालयांच्या स्वत:च्याच इतक्या शैक्षणिकदृष्टया समस्या आहेत की, ही महाविद्यालये स्वत:च एक समस्या बनलेली आहे. हया त्यांच्या समस्या कशाप्रकारे सोडवाव्यात हे देशील एक आव्हानच आहे. म्हणून असे वाटते की अशाप्रकारची विनाअनुदान शिक्षणशास्त्र महाविद्यालये हीच एक मोठी समस्या आहे.

२] विनाअनुदानित बी.एड्.महाविद्यालयातील समस्यांचे वर्गीकरण :-

विनाअनुदानित बी.एड्. .महाविद्यालयाच्या समस्यांचे वर्गीकरण पुढील प्रमाणे करता येईल.

१. विनाअनुदानित बी.एड्. महाविद्यालयांच्या शैक्षणिक समस्या.
२. विनाअनुदानित बी.एड्. महाविद्यालयांच्या आर्थिक समस्या.
३. विनाअनुदानित बी.एड्. महाविद्यालयांच्या भौतिक समस्या.
४. विनाअनुदानित बी.एड्. महाविद्यालयांच्या ग्रंथालयीन समस्या.
५. विनाअनुदानित बी.एड्.महाविद्यालयांच्या सामाजिक समस्या.

या प्रकरणामध्ये आपण विनाअनुदानित बी.एड्. महाविद्यालयांच्या शैक्षणिक समस्यांचा, भौतिक समस्येचा व ग्रंथालयीन समस्येंचाच विचार केलेला आहे.

3] <u>विना अनुदानित बी.एड्. महाविद्यालयांच्या शैक्षणिक समस्या :</u>

१. <u>अपुरा प्राध्यापकवृंद</u> :-

बहुसंख्य विना अनुदानित महाविद्यालयात अपुरा प्राध्यापक वृंद असतो. एकाच प्राध्यापकामार्फत दोन-दोन अध्यापन पध्दती शिकविल्या जातात. काही ठिकाणी विद्यार्थी संख्येच्या मानाने पाच किंवा सहाच प्राध्यापक असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना योग्य प्रकारे प्रशिक्षण दिले जात नाही. ही एक गंभीर समस्या आहे. दहास एक या प्रमाणात प्राध्यापक वर्ग असावा लागतो.

२. <u>अपात्र प्राध्यापक वर्ग</u> :-

बी.एड्. महाविद्यालयात एम.ए., एम्.एड्. किंवा एम्.एस्सी., एम्.एड्., उच्च द्वितीय श्रेणी असा प्राध्यापक असावा लागतो. या नियमामुळे विद्यापीठ मान्यताप्राप्त प्राध्यापक मिळणे अवघड जाते. त्यामुळे साहाजिकच कमी शैक्षणिक अर्हतेच्या प्राध्यापकाची नेमणूक करावी लागते. त्यामुळे प्रशिक्षणार्थींना मिळणा-या ज्ञानाच्या प्रगल्भतेवर परिणाम होतो. ~~त्यामुळे~~ प्रशिक्षणार्थ्यांच्या गुणवत्तेवर, दर्जावर परिणाम होण्याची शक्यता असते. ही देखील एक गंभीर समस्या आहे.

३. <u>अनअनुभवी प्राध्यापकवर्ग</u> :-

बी.एड्. महाविद्यालयात समृध्द, ज्ञानी, अनुभवी प्राध्यापक वृंदांची गरज असते. परंतु अपुरा पगार आणि नोकरीची अशाश्वती यामुळे अनुभवी प्राध्यापक या महाविद्यालयाकडे येत नाहीत. म्हणून नुकतेच बी.ए.,बी.एड्. किंवा बी.ए.,एम्.एड्. तसेच एम.ए. एम्.एड्.झालेले शिक्षक तसेच एम्एड्.झालेले शिक्षक नेमले जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होते.

12770
A

४. प्रशिक्षणार्थींना योग्य मार्गदर्शनाची समस्या :-

अपुरा प्राध्यापक वर्ग, अननुभवी मार्गदर्शक प्राध्यापक याचा परिणाम प्रशिक्षणार्थींना योग्य मार्गदर्शन न मिळण्यात होतो, स्वत:च अपूर्ण असलेला, अनुभव नसलेला प्राध्यापक विद्यार्थ्यांना योग्य ते मार्गदर्शन कसे करणार ?. ही देखील गंभीर समस्या आहे.

५] विना अनुदानित बी.एड्. महाविद्यालयाच्या भौतिक समस्या :

१. योग्य इमारतीच्या समस्या :-

ही महाविद्यालये झटपट निर्माण होतात. तेव्हा त्यांच्यासाठी योग्य इमारतीच्या फारच गंभीर समस्या निर्माण होतात. महाविद्यालयाची स्थापना हायस्कूलमध्ये, वर्कशॉपमध्ये तर कोठे गोडावूनमध्ये केली जाते. अशा ठिकाणी ही महाविद्यालये भरतात. काही अपवादात्मक ठिकाणीच योग्य पुरेशा इमारती असतात. यामुळे अध्ययनास पुरक वातावरण विद्यार्थ्यांना मिळत नाही. अनेक अडथळे [रहदारीचा आवाज, गॅरेजचा आवाज, शाळेतील मुलांचा गोंगाट] अध्ययन-अध्यापनात येतात.

२. प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शनासाठी खोल्यांचा अभाव :-

बी.एड्. महाविद्यालयात मार्गदर्शनासाठी प्रत्येक प्राध्यापकासाठी स्वतंत्र खोली ~~[छोटी]~~ किंवा केबिन असावी लागते. परंतु बहुसंख्य महाविद्यालयांमध्ये ही सोय उपलब्ध नसते. त्यामुळे मार्गदर्शनाच्या वेळेमध्ये खूप गोंधळ होतो. व मार्गदर्शनामध्ये अडथळे येतात.

३. प्रयोगशाळांचा अभाव :-

बहुसंख्य बी.एड्. महाविद्यालयांमध्ये मानसशास्त्र व सायन्स प्रयोगशाळा नसते. त्यामुळे मानसशास्त्राचे प्रयोग व्यवस्थित होत नाहीत. त्याप्रमाणे विज्ञान प्रयोगशाळा नसल्याने शास्त्र प्रशिक्षणार्थ्यांना सरावपाठासाठी लागणारे प्रयोग साहित्य स्वत: मिळवावे लागते.

४. स्वतंत्र ग्रंथालयाचा अभाव :-

ही शैक्षणिकदृष्ट्या अतिशय गंभीर समस्या आहे. त्यामुळे आवश्यक ती संदर्भ पुस्तके व क्रमिक पुस्तके पुरेशा प्रमाणात मिळत नाहीत.

५. मुलींच्यासाठी / मुलांसाठी स्वतंत्र वसतिगृहाचा अभाव.

६. मुलींच्यासाठी स्वतंत्र विश्रामगृहाचा अभाव.

७. अभ्यासिकेचा अभाव.

८. अपुरे व अयोग्य फर्निचर.

६] ग्रंथालयीन समस्या :-

बी.एड्. महाविद्यालयासाठी समृध्द, मोठया, स्वतंत्र ग्रंथालयाची फारच आवश्यकता असते. परंतु या विना अनुदानित बी.एड्. महाविद्यालयात स्वतंत्र ग्रंथालय नसते. ग्रंथालयात अनेक पुस्तकांचा अभाव असतो. संदर्भ ग्रंथ नसतात. कांही वेळा क्रमिक पुस्तके सुध्दा नसतात. प्रशिक्षित ग्रंथपाल नसतो.

अशाप्रकारे या विना अनुदानित बी.एड्. महाविद्यालयांच्या अनेक समस्या आहेत. या समस्यांचा सर्वदृष्टीकोनातून विचार करून त्या सोडविण्याचा प्रयत्न करणे अत्यंत निकडीचे आहे.

## - संदर्भ -

* पुढील तज्ञ व्यक्तींच्या लघुलेखांचे समालोचनासाठी संदर्भ घेतलेले आहेत. -

प्रकाशन स्थळ, वर्ष, प्रकाशक


१] डॉ. बी. जी. अहिरे
कस्तुरबाई शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सोलापूर : शासनाचे धोरण - विना अनुदान प्रशिक्षण महाविद्यालयांच्या समस्या [लघुलेख]

२] प्राचार्य चंद्रकांत मोरे
शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी : विनाअनुदान शिक्षणशास्त्र महाविद्यालये, कांही समस्या आणि उपाय. [लघुलेख]

३] प्रा. अरविंद टेके
सोलापूर सोशल असोशिएशनचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सोलापूर : विनाअनुदान बी. एड्. महाविद्यालयांच्या समस्या. [लघुलेख]

४] प्रा. सौ. आर्या भिडे
गुरुकृपा कॉलिज ऑफ एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, कल्याण [प], जिल्हा - ठाणे. : विनाअनुदान तत्वावरील शिक्षण महाविद्यालयांच्या समस्या. [लघुलेख]

५] प्रा. वसंत सीताराम देशपांडे
संचालक, शिक्षण अभ्यास केंद्र, इंडियन इन्स्टिट्युट ऑफ एज्युकेशन, पुणे. : विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांच्या समस्या. [लघुलेख]


....०....